# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 12 October 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १२ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत दोन दसरा मेळावे होत आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा दादर इथल्या शिवाजी पार्कवर तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेचा दसरा मेळावा आझाद मैदानात होत आहे. या दसरा मेळाव्यांसाठी दोन्ही पक्षांकडून जोरदार तयारी सुरू आहे.

****

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली होती. या दिवसाची आठवण म्हणून दरवर्षी प्रमाणे यंदाही नागपूर इथं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांचा नेतृत्वात दीक्षाभूमी स्मारक समिती आणि समता सैनिक दलाच्या प्रमुख उपस्थितीत सामुहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी शेकडो बौद्ध अनुयायी उपस्थित होते. उपस्थित अनुयायांना २२ प्रतिज्ञांचं वाचन करुन प्रतिज्ञा देण्यात आली, यासोबतच समता सैनिक दलाच्या सैनिकांनी मानवंदना देऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं. आज सायंकाळी सहा वाजता दीक्षाभूमीवर धम्म चक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

****

परभणी शहरातील श्री शिवप्रतिष्ठान आणि  विश्व हिंदू परिषदेच्या वतीनं विजयादशमीनिमित्त आज भव्य महादौड काढण्यात आली. शहरातील मुख्य भागातून शिवाजी महाराज पुतळा, नारायण चाळ, क्रांती चौक या मार्गे गेलेल्या या महादौडचा क्रीडा संकुलात सामूहिक महाआरतीनं समारोप झाला. परभणी शहरातली

ही सुमारे ४५ वर्षांची परंपरा आहे. राष्ट्रीय स्वंसेवक संघाच्या वतीनंही आज शहरात पथसंचलन करण्यात आलं.

****

विजयादशमी तसंच धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आज छत्रपती संभाजीनगर शहरात विविध कार्यक्रम होत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीनं सकाळी पथसंचलन करण्यात आलं तर राजाबाजार इथल्या संस्थान गणपती मंदिरासमोरील बालाजी मंदिरातून रथयात्रा काढण्यात आली. कर्णपुरा इथंही संध्याकाळी रथ महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बुद्ध लेणीच्या पायथ्याशी असलेल्या परिसरामध्ये लाखो समाज बांधव सकाळपासूनच एकत्र जमत आहेत. इथं मुख्य कार्यक्रम संध्याकाळी पार पडणार आहे तसंच सिडको एन-सात परिसरातील रामलीला मैदानावर संध्याकाळी रावण दहन होणार आहे.

****

नॅशनल कॉन्फरन्सच्या नेतृत्वाखालील आघाडीनं जम्मू-काश्मीरमध्ये सरकार स्थापन करण्याचा दावा केला आहे. पक्षाचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी काल श्रीनगरमध्ये उपराज्यपाल मनोज सिन्हा यांची भेट घेऊन त्यांना यासंदर्भातलं पत्र दिलं. यावेळी अब्दुल्ला यांनी काँग्रेस, आम आदमी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि इतर अपक्ष सदस्यांसह आघाडीच्या भागीदारांचे समर्थन पत्र उपराज्यपालांना सुपूर्द केलं. जम्मू आणि काश्मीरमधील विधानसभेच्या ९० जागांसाठी तीन टप्प्यात निवडणुका झाल्या, यामध्ये दहा वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर विक्रमी मतदान झालं आहे.

****

दरम्यान, हरियानात भाजपच्या नव्या सरकारचा येत्या १७ तारखेला शपथविधी सोहळा होणार आहे. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत, असं केंद्रीय मंत्री मनोहरलाल यांनी सांगितलं आहे.

****

आज जागतिक संधिवात दिन आहे. हाडांमध्ये पोषक तत्वांच्या कमतरतेमुळं असह्य वेदना होतात, यालाच संधिवात म्हणतात. हा दिवस दरवर्षी १२ ऑक्टोबर रोजी हाडांच्या आजारांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, एम्स इथल्या संधिवातशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉक्टर उमा कुमार यांनी संधिवात ओळखून त्यावर योग्य उपचार करणं आवश्यक

असल्याचं म्हटलं आहे. समाजमाध्यमं आणि ऐकीव माहीतीवरुन रुग्णांनी स्वतःहून उपचार घेऊ नये, असं आकाशवाणीशी बोलताना त्यांनी सांगितले.

****

महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित–महाप्रितनं राज्यात परवडणारी घरं, सौरऊर्जा आणि कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातील बदलाचं नेतृत्व करावं, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

महाप्रीत संचालक मंडळाची २५ वी बैठक मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत झाली. त्यावेळी ते बोलत होते. राज्यात होणाऱ्या विविध प्रकल्पांची कामं जलद आणि दर्जेदार करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. सौर ऊर्जा क्षेत्रात महाप्रित राज्यात आणि परराज्यात चांगले काम करत आहे. मुख्यमंत्री लघु उद्योग सौर छत योजना अंतर्गत प्रकल्पामुळे राज्यातील १० हजार लघु आणि मध्यम औद्योगिक घटकांना अक्षय ऊर्जा उपलब्ध होणार आहे असं ते म्हणाले.

****

भारत आणि बांगलादेश यांच्यातला तिसरा आणि शेवटचा टी–२० क्रिकेट सामना आज हैदराबाद इथं सायंकाळी सात वाजेपासून खेळवला जाणार आहे.

****